दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 7 जुलै 2026 | अंक क्र. 63 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# मुंबईत मुसळधार पावसाचा तडाखा! २९१ ठिकाणी झाडे कोसळली, २२ ठिकाणी भिंती-घरांचे नुकसान

■ मुंबई वृत्तसंस्था

मुंबईत सोमवारी (६ जुलै) दिवसभर मुसळधार पावसाने हजेरी लावली असून शहरातील जनजीवनावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ६ या कालावधीत शहर आणि उपनगरांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली. मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, शहरात तब्बल २९१ ठिकाणी झाडे व फांद्या कोसळल्याच्या, तर २२ ठिकाणी भिंती अथवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील तास मुंबई शहर आणि उपनगरात संततधार पाऊस कायम राहणार असून काही भागांत जोरदार ते अति जोरदार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. याशिवाय ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

महापालिकेच्या अहवालानुसार, मागील २४ तासांत कुलाबा येथे १२८ मिमी, तर सांताक्रूझ येथे १५९.२ मिमी पावसाची नोंद झाली. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कुलाबा येथे ३९.२ मिमी, तर सांताक्रूझ येथे ६९.६ मिमी पाऊस झाला. महापालिकेच्या स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रांनुसार शहरात २८.२ मिमी, पूर्व उपनगरात ६१.७५ मिमी आणि पश्चिम उपनगरात ६५.४५ मिमी पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे शहरात ७४, पूर्व उपनगरात ७८ आणि पश्चिम उपनगरात १३९ अशा एकूण २९१ ठिकाणी झाडे व फांद्या पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. तसेच १२ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना, तर २२ ठिकाणी भिंती किंवा घरांचे भाग कोसळल्याच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. संबंधित विभागांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आहे.

दरम्यान, पावसाचा जोर असूनही मुंबईतील रस्ते वाहतूक तसेच मध्य आणि पश्चिम रेल्वेची सेवा सुरळीत सुरू असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. मात्र, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी, समुद्रकिनाऱ्याजवळ जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




## भर पावसात सावता परिषदेचा एल्गार

### आष्टी नगरपंचायत समोर ठिय्या आंदोलन

■ आष्टी प्रतिनिधी :

आष्टी नगरपंचायतीच्या कारभाराविरोधातील असंतोष सोमवारी भर पावसात उघडपणे रस्त्यावर उतरला. सावता परिषदेच्या नेतृत्वाखाली नगरपंचायत कार्यालयासमोर जोरदार ठिय्या आंदोलन छेडण्यात आले.मुसळधार पावसाची पर्वा न करता कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक अनेक तास आंदोलनस्थळी ठामपणे उभे राहिले. घोषणाबाजीने नगरपंचायत परिसर दणाणून गेला आणि विकासकामांबाबत संपूर्ण पारदर्शकतेची मागणी जोर धरू लागली.

सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते संपत शिवाजी सायकड यांनी आरोप केला की, शासनाकडून दलित वस्ती, आरक्षित प्रभाग तसेच १३ वा, १४ वा आणि १५ वा वित्त आयोगांतर्गत मंजूर झालेल्या विकास निधीतील अनेक कामांबाबत गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. कागदोपत्री विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात अनेक भागांत मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचा दावा त्यांनी केला. "कामे झाली कुठे?", "जनतेचा पैसा गेला कुठे?", "हिशोब द्या!", "चौकशी करा!", "सत्य



बाहेर आणा!" अशा घोषणांनी आंदोलनकर्त्यांनी नगरपंचायत प्रशासनाला जाब विचारला. भर पावसातही आंदोलनकर्त्यांचा निर्धार डळमळला नाही. निवेदनात विविध विकासकामांच्या खर्चाची प्रत्यक्ष पडताळणी, स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण, माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली संपूर्ण कागदपत्रे सार्वजनिक करणे आणि आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संपत शिवाजी सायकड यांनी सांगितले की, "जनतेच्या पैशाचा एक-एक रुपया कुठे खर्च झाला, याचा स्पष्ट हिशोब मिळालाच पाहिजे. चौकशी होऊन सत्य समोर आले नाही, तर हे आंदोलन तालुकाभर तीव्र करण्यात येईल."

आंदोलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला आणखी बळ मिळाल्याचे चित्र दिसून आले. या आंदोलनात साहेबराव (बंटी) सायकड, विकास सायकड, निवृत्ती सायकड, राहुल सायकड ,राम गाडे, मनसे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांच्यासह सावता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम; पालघर, रायगडला रेड अलर्ट, अनेक जिल्ह्यांना ऑरेंज आणि यलो अलर्ट

■ मुंबई : वृत्तसंस्था

राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाचा जोर कायम असून हवामान विभागाने पुढील दोन दिवसांसाठी विविध जिल्ह्यांना रेड, ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी केला आहे. कोकण, घाटमाथा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांत अतिवृष्टीची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

कोकण विभागात पालघर आणि रायगड जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून सिंधुदुर्गसाठी यलो अलर्ट आहे. सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे प्रशासनाने म्हटले आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पुणे घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट आणि सातारा घाटमाथ्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुणे, अहिल्यानगर आणि कोल्हापूर जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत ताशी 60 ते 70 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूरमध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर नाशिक जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांतील नद्या आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने सखल भागांमध्ये सतर्कता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

विदर्भात अकोला आणि अमरावती जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून बुलढाणा आणि वर्धा जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



मराठवाड्यात सध्या कोणताही विशेष अलर्ट नसला तरी छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नद्या दुथडी भरून वाहत आहेत. दरड कोसळणे, झाडे उन्मळून पडणे आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असा सल्ला देण्यात आला आहे. काही भागांमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असून मुंबईत खासगी कार्यालयांना शक्य असल्यास 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राज्यातील शिक्षकांना मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षणाचे (SIR) काम!

### शाळा,विद्यार्थी व शिक्षण वाऱ्यावर!; 'एसआयआर' च्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे!

#### मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

■ परळी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम सुरू आहे. त्याकामासाठी 'मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणून शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. शिक्षक त्याकामात व्यस्त असल्याने शाळा,विद्यार्थी आणि शिक्षण वाऱ्यावर सोडण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा निर्णय असल्याने पालक व विद्यार्थी वर्गात प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन एसआयआरच्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्षाची नुकतीच सुरुवात झालेली आहे. मुलं शाळेत येत आहेत. आगोदरच शिक्षक संख्या पुरेशी नसल्याने जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिका व खाजगी अनुदानित शाळेसमोर अनंत अडचणी आहेत. अशा परिस्थितीत



बहुतांश शिक्षकांना निवडणूक विभागाने 'मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

कामाचे स्वरूप पहाता हे काम पूर्ण वेळ केले तरी निर्धारित तीन महिन्यांत शिक्षकांची दमछाक होणार आहे. एवढा प्रदीर्घ कालावधीत राज्यातील अध्यापन प्रक्रिया कोलमडून पडणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार आहे. शाळेत शिकविण्यास प्रथम प्राधान्य देणाऱ्या शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत, ही अतिशय संतापजनक व खेदाची बाब आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की,मा. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निकालानुसार शिक्षकांना सुटीच्या काळात करता येईल एवढेच काम देण्याचे आदेशित करण्यात आले आहे तद्वतच शिक्षण हक्क कायदा (आरटीई),2009 नुसार शिक्षकांचे मुख्य कर्तव्य केवळ अध्यापन करणे हेच आहे. जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित शाळेतील बहुतांश शिक्षक एसआयआर कामासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. परिणामी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीलाच अध्ययन अध्यापन प्रक्रिया ढेपाळली आहे. अनेक शाळा बंद असल्यासारख्याच आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमधे प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन मतदार याद्या सखोल पुनर्निरिक्षण कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही.जी.पवार,अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,गुठे एस.जी.,पवार टी.जी.,माळी एन. जी.,रेखा सोळुंके, अशोक मस्कले, बंडू अघाव, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी.,कुरेशी ए.एन.,राठोड पी.आर.,सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही.जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस.,जमादार एफ.जी.,पाटील पी.एस. कालीदास धपाटे, व्यकंट चिलवरवार, बसवेश्वर स्वामी, शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम.गणेश आजबे, चंद्रकांत चव्हाण, रवींद्र वाकोडे, माने जी.व्ही.,विक्रम मायाचारी, संजय येळवंते,कदम एन.टी.,ढेंगळे व्ही.एस. आदिंची नावे आहेत.

# नव्या युगाची चाहूल...!

## वैभव सूर्यवंशीचे क्रिकेटविश्वाला वेड



■ मुंबई वृत्तसंस्था

आयपीएलमध्ये दरवर्षी नवे तारे चमकतात, काही खेळाडू मोठ्या रकमांमुळे चर्चेत राहतात, तर काही आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे. मात्र आयपीएल २०२६ मध्ये जे घडत आहे, ते केवळ 'ब्रेकथ्रू' नाही, तर एका नव्या युगाची सुरुवात असल्यासारखे वाटत आहे. राजस्थान रॉयल्सचा अवघा १५ वर्षीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी हा आता फक्त युवा प्रतिभा राहिलेला नाही, तर भारतीय क्रिकेटमधील सर्वात मोठा चर्चेचा विषय बनला आहे. या मोसमात सूर्यवंशीने ज्या पद्धतीने अनुभवी गोलंदाजांना अक्षरशः हतबल केले आहे, ते पाहता क्रिकेटविश्व थक्क झाले आहे. जसप्रीत बुमराह, पॅट कमिन्स, जोश हेझलवूड, मोहम्मद सिराज, भुवनेश्वर कुमार यांसारख्या जागतिक दर्जाच्या गोलंदाजांविरुद्ध तो ज्या सहजतेने फटकेबाजी करत आहे, ती एखाद्या अनुभवी फलंदाजालाही लाजवेल अशी आहे. विशेष म्हणजे, हा खेळाडू अजून किशोरवयीन आहे. सूर्यवंशीची या मोसमातील ६८० धावांची कमाई आणि तब्बल २४२.८५ चा स्ट्राइक रेट ही आकडेवारी केवळ प्रभावी नाही, तर आयपीएलच्या इतिहासात अभूतपूर्व मानली जात आहे. एका मोसमात ६०० पेक्षा अधिक धावा करताना २०० च्या वर स्ट्राइक रेट राखणारा तो पहिलाच फलंदाज ठरला आहे. एवढेच नव्हे, तर त्याने ६५ षटकार ठोकत ख्रिस गेलचा एका मोसमातील सर्वाधिक षटकारांचा विक्रमही मोडला. गेल आणि आंद्रे रसेल यांसारख्या 'पॉवर हिटर्स'नाही त्यांच्या सर्वोत्तम मोसमात हा टप्पा गाठता आला नव्हता.

सूर्यवंशीच्या या कामगिरीमुळे आता त्याची तुलना थेट विराट कोहलीच्या २०१६ च्या ऐतिहासिक मोसमाशी होऊ लागली आहे. २०१६ मध्ये कोहलीने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडून खेळताना ९७३ धावांचा विक्रमी पाऊस पाडला होता. तो मोसम आजही आयपीएल फलंदाजीचा सर्वोच्च मानदंड मानला जातो. त्या वेळी कोहली आपल्या कारकिर्दीच्या शिखरावर होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा प्रचंड अनुभव, जागतिक स्तरावरील दबाव आणि नेतृत्वाची जबाबदारी त्याच्याकडे होती. मात्र सूर्यवंशीच्या बाबतीत चित्र पूर्णपणे वेगळे आहे. क्रिकेटच्या प्राथमिक टप्प्यात असलेला हा मुलगा आयपीएलसारख्या स्पर्धेत इतक्या सहजतेने राज्य करत आहे, हेच त्याच्या कामगिरीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य मानले जात आहे. कोहलीने २०१६ मध्ये गुजरात लायन्स, रायझिंग पुणे सुपरजायंट आणि पंजाब किंग्जविरुद्ध शतके झळकावत संपूर्ण स्पर्धा गाजवली होती. दुखापत असूनही पंजाबविरुद्ध ५० चेंडूंत ११३ धावांची खेळी करत त्याने जिद्दीचे दर्शन घडवले होते. त्याचा १५२ चा स्ट्राइक रेट त्या काळात अविश्वसनीय मानला जात होता.

मात्र सूर्यवंशीने फलंदाजीची व्याख्याच बदलल्यासारखे वाटत आहे. त्याची १७ चेंडूंत ५२ धावांची सुरुवातीची खेळी, आरसीबीविरुद्ध ७८ धावांची विस्फोटक खेळी, ३७ चेंडूंत झळकावलेले शतक आणि लखनऊविरुद्ध ३८ चेंडूंत ९३ धावांची धडाकेबाज खेळी यामुळे राजस्थानला अनेक सामने एकहाती जिंकता आले. परंतु त्याच्या मोसमातील सर्वात मोठा क्षण ठरला तो सनरायझर्स हैदराबादविरुद्धचा एलिमिनेटर सामना. दबावाच्या परिस्थितीत सूर्यवंशीने केवळ २९ चेंडूंत सामन्याचे चित्र काही षटकांत बदलून टाकले.

१२ षटकारांसह त्याने एसआरएचच्या गोलंदाजांचा आत्मविश्वासच खच्ची केला. ख्रिस गेलचा ३० चेंडूत शतकाचा विक्रम मोडण्याच्या उंबरठ्यावर तो पोहोचला होता. या मोसमात सूर्यवंशीने केवळ धावा केल्या नाहीत, तर टी-२० क्रिकेटच्या अपेक्षाच बदलून टाकल्या आहेत. पॉवरप्लेचा अर्थ, स्ट्राइक रेटचे महत्त्व आणि धावगतीची व्याख्या यांना त्याने नवी दिशा दिली आहे. विराट कोहलीचा २०१६ चा मोसम हा फलंदाजीतील परिपूर्णतेचा नमुना होता; तर वैभव सूर्यवंशीचा २०२६ चा मोसम हा निडरतेचा, विस्फोटकतेचा नव्या पिढीच्या आत्मविश्वासाचा चेहरा बनला आहे. कोणता मोसम अधिक महान, यावर मतभेद होऊ शकतात; पण एक गोष्ट निश्चित आहे, आयपीएलने याआधी वैभव सूर्यवंशीसारखा 'बॅटिंग फ्रीकशो' कधीच पाहिला नव्हता. पण आकडेवारीच्या पलीकडे जाऊन त्याने जे साध्य केले आहे, ते भारतीय क्रिकेटच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. कारण हा केवळ एका खेळाडूचा उदय नाही, तर नव्या युगाची चाहूल आहे.

# आयपीएलमध्ये खेळाडूंच्या 'फिटनेस'चा खेळखंडोबा !

■ नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

यंदाच्या आयपीएल हंगामाच्या अखेरीस केवळ उपांत्य फेरीतील संघ निश्चित झाला नाही, तर भारतीय क्रिकेटपटूंच्या तंदुरुस्ती व्यवस्थापनाचा गंभीर प्रश्नही पुन्हा एकदा समोर आला आहे. राजस्थान, मुंबई, दिल्ली आणि कोलकाता यांच्या सामन्यांदरम्यान अनेक खेळाडू दुखापती असूनही मैदानात उतरल्याचे स्पष्ट झाले असून त्यावरून क्रिकेट वर्तुळात चिंता व्यक्त होत आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या उत्कृष्टता केंद्रात बुमराहवर उपचार झाले होते. ही दुखापत पाठीची नसून गुडघ्याशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. तरीदेखील त्याला सुरुवातीपासूनच अंतिम संघात स्थान देण्यात आले. दुसरीकडे रोहित शर्माच्या दुखापतीच्या काळात मात्र मुंबई संघाने अधिक सावध भूमिका घेतल्याचे दिसून आले.

तर कोलकाता संघाचा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती हाही सूक्ष्म हाडांच्या दुखापतीसह खेळत असल्याचे उघड झाले. संघाचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने वैद्यकीय पथकाच्या सल्ल्यानुसारच हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. पंजाब संघाचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग हाही शारीरिक मर्यादांसह खेळत असल्याचे संघ व्यवस्थापनाने सांगितले. या सर्व घटनांमुळे आयपीएलमधील स्पर्धात्मक दबाव आणि भारतीय क्रिकेटपटूंच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएलदरम्यान खेळाडूंच्या कामाच्या ताणावर थेट नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मात्र आगामी आंतरराष्ट्रीय मालिकांच्या पार्श्वभूमीवर दुखापतग्रस्त किंवा मानसिकदृष्ट्या थकलेले खेळाडू भारतीय संघासाठी धोक्याची घंटा ठरू शकतात, अशी भीती आता व्यक्त केली जात आहे.



# 'कॉन्फरन्स लीग'च्या अंतिम सामन्यापूर्वी राडा !

## जर्मनीत इंग्लंड-स्पेनचे फुटबॉल चाहते भिडले

■ लाइपझिग (वृत्तसंस्था):

युरोपियन कॉन्फरन्स लीगच्या ऐतिहासिक अंतिम सामन्यापूर्वी जर्मनीतील लाइपझिग शहराला हिंसक गालबोट लागले आहे. इंग्लंडचा 'क्रिस्टल पॅलेस' आणि स्पेनचा 'रायो वॅलेकॅनो' यांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या राड्यामुळे सामन्यापूर्वी शहरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जर्मन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका रेस्टॉरंटबाहेर क्रिस्टल पॅलेसचे चाहते बसले असताना अचानक सुमारे ३०० रायो वॅलेकॅनो समर्थकांचा गट तिथे धडकला. दोन्ही गटांतील शाब्दिक चकमकीचे रूपांतर काही वेळातच हिंसक संघर्षात झाले. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर काचेच्या बाटल्या, बिअरचे ग्लास आणि रेस्टॉरंटमधील खुर्च्यांची फेकाफेक केली. यानंतर दुसऱ्या एका घटनेत ६० क्रिस्टल पॅलेस समर्थकांनी स्पॅनिश चाहत्यांना पुन्हा चिथावणी दिल्याने पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी जर्मन पोलिसांना मोठा बंदोबस्त तैनात करावा लागला. या मोहिमेत दोन पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून, पोलिसांनी तात्काळ

दोन दंगलखोरांना ताब्यात घेतले आहे. तसेच संशयित ३०० हून अधिक लोकांची ओळख पटवून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. विशेष म्हणजे, क्रिस्टल पॅलेस आणि रायो वॅलेकॅनो हे दोन्ही संघ आपल्या फुटबॉल इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या युरोपीय स्पर्धेच्या अंतिम सामन्यात समोरासमोर येत आहेत. क्रिस्टल पॅलेसचे मुख्य प्रशिक्षक ऑलिव्हर ग्लास्नर यांच्यासाठी क्लबमधील हा अखेरचा सामना असल्याने हा सामना महत्त्वाचा आहे.

क्रिस्टल पॅलेसने हा सामना जिंकल्यास युरोपीय फुटबॉलवर इंग्लंडच्या क्लबांचे ऐतिहासिक वर्चस्व प्रस्थापित होईल. यंदाच्या हंगामात ॲस्टन व्हिलाने आधीच युरोपा लीगवर नाव कोरले आहे, तर दुसरीकडे, आगामी शनिवारी होणाऱ्या सर्वात मोठ्या 'चॅम्पियन्स लीग' अंतिम सामन्यात आर्सेनल संघ पॅरिस सेंट-जर्मन विरुद्ध मैदानात उतरणार आहे.

# सिंधूचा जपानी खेळाडूवर एकहाती विजय ; लक्ष्य सेनला वॉकओव्हर

■ सिंगापूर वृत्तसंस्था

सिंगापूर ओपन सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी केली आहे. भारतीय खेळांडूनी चांगली कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता पीव्ही सिंधू, स्टार शटलर लक्ष्य सेन तसेच पुरुष दुहेरीतील सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने दमदार विजय मिळवत पुढील फेरीत धडक मारली आहे. महिला एकेरीत पीव्ही सिंधूने जपानच्या रिको गुंजीचा अवघ्या दोन गेममध्ये 21-9, 21-12 असा सहज पराभव केला. सुरुवातीपासूनच सिंधूने सामन्यावर वर्चस्व राखला होता. तीने प्रतिस्पर्धीला कोणतीही संधी दिली नाही. मात्र, उपांत्यपूर्व फेरीत सिंधूसमोर मोठं आव्हान असणार आहे. तिचा सामना आता दक्षिण कोरियाच्या अव्वल मानांकित ॲन से यंगशी होणार आहे. हा सामना सिंधूसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

### लक्ष्य सेनला नशिबाची साथ

पुरुष एकेरीत भारताचा स्टार खेळाडू लक्ष्य सेनला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागली नाही. पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता आणि थायलंडचा खेळाडू कुन्लावुत विटिडसर्न याने सामना सुरू झाल्यानंतर अवघ्या एका मिनिटात दुखापतीमुळे माघार घेतली. त्यामुळे लक्ष्य सेनला वॉकओव्हर मिळाला आणि थेट उपांत्यपूर्व फेरित स्थान मिळाला.आता उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेनचा सामना जपानच्या कोकी वातानाबेशी होणार आहे. जागतिक क्रमवारीत 19व्या स्थानावर असलेला वातानाबे चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे हा सामना रंगतदार होण्याची शक्यता आहे.

**भारताच्या पदकाच्या आशा उंचावल्या**

**■ सिंगापूर ओपनमध्ये भारतीय खेळाडूंची आतापर्यंतची कामगिरी पाहता भारताच्या पदकाच्या आशा आणखी उंचावल्या आहेत. अनुभवी सिंधूपासून युवा लक्ष्य सेनपर्यंत आणि दुहेरीतील सात्विक-चिरागपर्यंत सर्वच खेळाडू उत्कृष्ट फॉर्ममध्ये दिसत आहेत.**

### सात्विक-चिरागची संघर्षपूर्ण जीत

भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना मात्र पुढील फेरी गाठण्यासाठी कडवी झुंज द्यावी लागली. त्यांनी चायनीज तैपेईच्या ली झी हुई आणि यांग पो सुआन या जोडीचा 21-15, 11-21, 21-18 असा पराभव केला. तीन गेमपर्यंत रंगलेल्या या सामन्यात भारतीय जोडीने निर्णायक क्षणी उत्कृष्ट खेळ करत विजय मिळवला आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना आता मलेशियाच्या खाई जिंग कांग आणि ॲरॉन ताई या जोडीशी होणार आहे.

### ध्रुव-तनिषाचीही उपांत्यपूर्व फेरीत एन्ट्री

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या भारतीय जोडीनेही शानदार पुनरागमन करत विजय मिळवला. त्यांनी जपानच्या युटा वातानाबे आणि माया




तागुची या जोडीचा 8-21, 21-17, 21-16 असा पराभव केला. पहिला गेम गमावल्यानंतर भारतीय जोडीने दमदार कमबॅक करत सलग दोन गेम जिंकले. आता त्यांचा सामना कोरियाच्या किम जे ह्योन जांग-हा जोंग जोडी किंवा मलेशियाच्या तिसऱ्या मानांकित चेन टँग जी-तोह ई वेई यांच्यापैकी एका जोडीशी होणार आहे.

# प्रज्ञानानंदाचा ऐतिहासिक विजय ! जगज्जेता कार्लसनला हरवले ; गुकेश पुन्हा पराभूत !

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने नॉर्वे चेस २०२६ स्पर्धेत जगातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्नस कार्लसनला पराभूत करत मोठा उलटफेर घडवून आणला. क्लासिकल फॉरमॅटमध्ये मिळवलेल्या या शानदार विजयामुळे प्रज्ञानानंदाने पुन्हा एकदा जागतिक बुद्धिबळ विश्वाचं लक्ष वेधून घेतलं आहे. या विजयासह तो ४.५ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आला आहे.विशेष म्हणजे, नॉर्वे चेस स्पर्धेत प्रज्ञानानंदाने कार्लसन क्लासिकल फॉरमॅटमध्ये दुसऱ्या वेळा पराभूत झाला आहे. यापूर्वी २०२४ मध्येही त्याने माजी विश्वविजेत्याला धक्का दिला होता. सामन्यानंतर प्रज्ञानानंद म्हणाला की, सामना अत्यंत बरोबरीचा झाला आणि शेवटच्या क्षणी निकाल कोणाच्याही बाजूने लागू शकत होता.

**सात वेळांचा चॅम्पियन कार्लसन तळाला :** घरच्या मैदानावर खेळणाऱ्या सात वेळच्या विजेत्या मॅग्नस कार्लसनची मात्र स्पर्धेत निराशाजनक कामगिरी सुरू आहे. सहा खेळाडूंच्या स्पर्धेत तो केवळ १.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर घसरला आहे. प्रज्ञानानंदाविरुद्धचा पराभव कार्लसनसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

**गुकेशचा सलग दुसरा पराभव :** दरम्यान, विद्यमान विश्वविजेता डी गुकेशचा खराब फॉर्म कायम राहिला आहे. फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजाने त्याला आर्मगेडन टायब्रेकरमध्ये पराभूत करत १.५ गुण मिळवले. जवळपास पाच तास चाललेला क्लासिकल सामना ड्रॉमध्ये सुटला, मात्र आर्मगेडनमध्ये फिरोजाने बाजी मारली. जखमी अवस्थेत खेळत असूनही फिरोजाने सलग विजय मिळवत 7.5 गुणांसह अव्वल स्थान अधिक मजबूत केलं आहे. सामना संपल्यानंतर तो व्हीलचेअर आणि मून बूटमध्ये



दिसला. दुसरीकडे गुकेश ३.५ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. पुढील फेरीत त्याचा सामना थेट मॅग्नस कार्लसनशी होणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

**दिव्या देशमुखची विजयी मालिका कायम :** महिला गटात भारताच्या दिव्या देशमुखने दमदार कामगिरी कायम ठेवली आहे. तिने स्पर्धेतील आघाडीवर असलेल्या बिबिसारा असाउबायेवाला आर्मगेडनमध्ये पराभूत करत तिसरा टायब्रेकर विजय नोंदवला आहे. या विजयासह दिव्या ४.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. तर अनुभवी भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीला अन्ना मुजिचुककडून पराभव पत्करावा लागला. ती दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे.

### काय असतो आर्मगेडन फॉरमॅट?

बुद्धिबळात आर्मगेडन हा सडन-डेथ टायब्रेकर प्रकार असतो. क्लासिकल सामना ड्रॉ झाल्यास निकाल निश्चित करण्यासाठी हा सामना खेळवला जातो. या फॉरमॅटमध्ये ड्रॉची शक्यता नसते आणि कोणत्याही परिस्थितीत विजेता निश्चित केला जातो.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ आनंदवन येथे होणार



बाबा व साधना ताई आमटे | प्रा. कैतिकराव ठाले पाटील व अनुराधा पाटील | अशोक भवरलालजी जैन | डॉ. अक्षयकुमार काळे | दिलीप पांढरपट्टे | प्रा. डॉ. रणधीर शिंदे | प्रा. डॉ. गिरीक्ष कुलकर्णी | पद्मश्री डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी ताई आमटे | डॉ.विकास व डॉ. भारती आमटे

## मानकरी ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील

### अशोक भवरलालजी जैन यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. अक्षयकुमार काळे, दिलीप पांढरपट्टे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. गिरीश कुलकर्णी व आमटे परिवार यांची उपस्थिती लाभणार

अंबाजोगाई | प्रतिनिधी

थोर समाजसेवक बाबा आमटे आणि त्यांच्या कार्याला खंबीर साथ देणाऱ्या साधनाताई आमटे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी येथील साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने साधनाताई आमटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे (१९२६-२०२६) औचित्य साधून २०२६ पासून 'साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार' दिला जाणार आहे. या वर्षीचा पहिला पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ कवयित्री व लेखिका अनुराधा पाटील व ज्येष्ठ लेखक व मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील या दांपत्याला अशोक भवरलालजी जैन, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम ली. जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे-नागपूर, यांच्या मुख्य उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे. यावेळी पनवेल येथील निवृत्त सनदी अधिकारी ख्यातनाम मराठी व उर्दू गझलकार दिलीप पांढरपट्टे, कोल्हापूर येथील साहित्य समीक्षक डॉ. रणधीर शिंदे, स्नेहालय, अहिल्यानगरचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, आनंदवनचे डॉ. विकास व डॉ. भारती आमटे, लोक बिरादरी प्रकल्प, भामरागडचे पद्मश्री डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांची उपस्थिती लाभणार आहे. हा पुरस्कार साधनाताई आमटे यांच्या पुण्यतिथी दिनी आनंदवन जिल्हा चंद्रपूर येथे प्रदान केला जाणार आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. शुभदा राठी-लोहिया, सचिव दगडू लोमटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. गुरुवार दिनांक ९ जुलै २०२६ सकाळी ११ वाजता स्वरानंदवन हॉल, आनंदवन, वरोरा येथे हा समारंभ साजरा केला जाईल.

बाबा व साधनाताई यांनी कुष्ठरोगी, अंध, अपंग, मूकबधिर, आदिवासी यांच्यासाठी महारोगी सेवा समिती स्थापन करून आरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन, रोजगार उपलब्ध करून उत्तम व सन्मानाने, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य खर्च केले. साहित्य, कला, संगीत व ललितकला या क्षेत्रातही मोठ काम केले आहे. तसेच या क्षेत्रातील साहित्यिक, कलावंतांनी बाबांच्या कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यासाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. पुरस्काराचे स्वरूप शाल, स्मृतिचिन्ह, मानपत्र, पुष्पहार व एक लाख रुपये असे आहे. पहिला पुरस्कार साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय लेखन कार्य व साहित्य क्षेत्रात प्रचार व प्रसार करण्यासाठी आपले योगदान देणाऱ्या मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील ठाले पाटील दांपत्यास हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष डॉ. शुभदा लोहिया, सचिव दगडू लोमटे व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे. अंबाजोगाई सारख्या गाववजा शहरातून हा पुरस्कार सुरू केल्या बद्दल महाराष्ट्रातील साहित्य, कला संगीत व ललितकला क्षेत्रातील सर्वांनी याचे कौतुक करून समाधान व्यक्त केले आहे. हा पहिलाच पुरस्कार असल्याने सर्वांना उत्कंठा लागली आहे.

# महागाव-गुंज रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी संतप्त नागरिक तहसीलवर धडकले

## तहसीलदारांवर टीका करणाऱ्यांबाबत नाराजी

**महागाव |** गुंज हा महत्त्वाचा संपर्क मार्ग मोठ्या प्रमाणात खड्ड्यांनी व्यापल्यामुळे नागरिकांचे हाल होत असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, या मागणीसाठी सोमवारी विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते आणि शेकडो नागरिकांनी तहसील कार्यालयात निवेदन सादर केले. महागाव आणि पुसद या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या या मार्गाची दुरवस्था लक्षात घेता नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. निवेदनावेळी बहुतांश उपस्थितांनी रस्त्याचा प्रश्न मांडला मात्र काहींनी तहसीलदार अभय मस्के यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाची टीका केल्याने मुळ प्रश्न भरकटला. वैयक्तिक आकसापोटी बिनबुडाचे वक्तव्य करणाऱ्या अशा लोकांमुळे मूळ मुद्द्याला हरताळ फसला जातो अशी जनभावना यावेळी व्यक्त होत होती.

अनेक उपस्थितांनी जनहिताच्या प्रश्नावर आयोजित आंदोलनात व्यक्तिनिष्ठ टीका होणे योग्य नसल्याची भावना व्यक्त केली. तहसीलदार अभय मस्के हे मतदारांच्या विशेष सखोल पुनरावलोकन (स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन ) कार्यक्रमासाठी हिवरा येथे गेले होते. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या एस.आय.आर. मोहिमेसाठी सकाळपासून ते हिवरा येथे दौऱ्यावर होते. त्यामुळे ते निवेदन स्वीकारण्यासाठी कार्यालयात उपस्थित नव्हते. गेल्या सुमारे २१ महिन्यांपासून महागाव तालुक्यात कार्यरत असलेल्या तहसीलदार अभय मस्के यांनी महसुली कामांसह शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिक आणि गावपातळीवरील प्रश्नांसाठी प्रत्यक्ष क्षेत्रभेटींना प्राधान्य दिल्याचे अनेक नागरिकांचे मत आहे.

त्यामुळे काही व्यक्तींनी केलेल्या वैयक्तिक टीकेबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली असून, प्रशासनाच्या कामकाजावर टीका करावी; मात्र ती तथ्याधारित आणि सभ्य भाषेत असावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. दरम्यान, आंदोलनाचा मूळ हेतू असलेल्या महागाव-गुंज मार्गाच्या दुरुस्तीला प्राधान्य देऊन संबंधित विभागाने तातडीने काम सुरू करावे, हीच परिसरातील नागरिकांची प्रमुख मागणी आहे.



दै. जगमित्रचे संपादक बालासाहेब कडबाने यांच्यावर दाखल झालेला गुन्हा मागे घेण्यात यावा यासाठी परळी संपादक संघाच्या वतीने परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री नाचन साहेब यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे ढोणे साहेब,वैद्यनाथ वार्ताचे संपादक रामप्रसाद गरड, महाराष्ट्र प्रतिमाचे ज्ञानोबा सुरवसे, रणधुमाळीचे कैलास डुमणे, देवगिरी वृत्तचे संदीप मस्के, दै.मराठवाडा साथीचे अनिल गायकवाड छायाचित्रात दिसत आहेत.



## "आषाढी वारीसाठी आळंदी-देहूकडे जाणाऱ्या वारकऱ्यांनी पुण्यातच थांबा": ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे

परळी | वार्ताहर : आषाढी एकादशीच्या वारीनिमित्त *आळंदी व देहू*कडे प्रस्तान करणाऱ्या सर्व वारकऱ्यांसाठी महत्वाची सूचना देण्यात आली आहे.

अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी आवाहन केले आहे की, "सध्या इंद्रायणी नदीला महापूर आल्याने कोणत्याही वारकऱ्यांनी आळंदी व देहूकडे जाऊ नये. आपल्या सुरक्षिततेसाठी पुणे येथेच थांबावे."

महाराज म्हणाले, "माऊली व जगद्गुरूंची वारी ही श्रद्धेची आहे, पण जीविताची काळजी घेणे हे देखील धर्मच आहे. नदीला आलेल्या महापुरामुळे मार्ग बंद आहेत. त्यामुळे सर्व वारकऱ्यांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून पुण्यातच मुक्काम करावा."

वारकरी सांप्रदायातील सर्व मंडळे, दिंड्या वैयक्तिक वारकऱ्यांनी या आवाहनाची नोंद घ्यावी, असे आवाहनही कोकाटे महाराजांनी केले

## शिक्षक बदली प्रकरण ;

# दुसऱ्या दिवशीही हिवरा (गो.) ग्रामस्थांनी शाळा केली बंद

### नियुक्त रद्द करावी अथवा रिक्त जागा भरण्याची मागणी; प्रशासनाने अद्याप दखल घेतली नाही

सिरसाळा | अतुल बडे

परळी तालुक्यातील हिवरा गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील एका शिक्षकाची प्रतिनियुक्ती बदली केली असल्याने संतप्त ग्रामस्थ व शालेय व्यावस्थापन समितीने एकत्र येत शाळेला टाळे ठोकले आहे. दिनांक ४ जुलै रोजी हिवरा ग्रामस्थांनी अंदोलन करत शाळेला कुलूप ठोकले होते व काल दिनांक ६ जुलै देखील संतप्त ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे एकत्र येत अंदोलन करत शाळा बंद केली . शिक्षक बदली प्रकरणी संबंधित प्रशासन लक्ष देत नाही. या मुळे हिवरा ग्रामस्थ अधिकच आक्रमक होत आहेत. भानुदास संभाजी गुडदे असे प्रतिनियुक्ती झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. लाडझरी केंद्र अंतर्गत असलेल्या दौंडवाडी येथे त्यांची नियुक्त केली आहे. सदरील नियुक्ती माजी आमदार संजय दौंड यांच्या सूचनेवरुन तसेच शालेय व्यावस्थापन समिती दौंडवाडी यांच्या निवेदन मागणी वरुन संबंधित शिक्षकाची प्रतिनियुक्ती केली असल्याचे गट शिक्षण अधिकारी कार्यालय पंचायत समिती परळी वैजनाथ पत्रात म्हटले आहे. बदली रद्द करावी किंवा रिक्त पद तात्काळ भरावे या मागणी वरुन हिवरा ग्रामस्थ आक्रमक झाले. दिनांक २ जुलै रोजी बदलीचे पत्र गट शिक्षण अधिकारी कार्यालय परळी यांनी काढले , हि बाब हिवरा ग्रामस्थांना समजताच दिनांक ४ जुलै रोजी शाळेत उपस्थित शिक्षक, विद्यार्थी यांना बाहेर काढत शाळेच्या गेटला टाळे ठोकले. शिक्षक भानुदास गुडदे अंत्यत हुशार,शिस्तप्रिय व विद्यार्थी घडवणारे शिक्षक असुन आम्हाला हेच शिक्षक या ठिकाणी हवे आहेत अशी भावना व्यक्त करत संतप्त हिवरा ग्रामस्थांनी गेटला टाळे ठोकत अंदोलन केले आहे. काल अंदोलनाचा दुसरा दिवस होता ,आपली मागणी घेऊन ग्रामस्थांनी शाळे पुढे अंदोलन केले परंतु गट शिक्षण अधिकारी कार्यालय परळी व बीड शिक्षण विभाग यांनी दखल घेतली नाही. जो पर्यंत तोडगा निघत नाही तोपर्यंत अंदोलन सुरुच राहिल असा ठाम पवित्रा हिवरा ग्रामस्थांनी घेतला आहे.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार 7 जुलै 2026



# संकल्प विद्या मंदिर शाळेतील 'आनंदनगरी' मधून एक लाखाहून अधिकची आर्थिक उलाढाल!

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना देणारी शाळा म्हणजे संकल्प विद्या मंदिर - श्री विजय रापतवार

## व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी, परिश्रम व शिक्षण आवश्यक - सय्यद कादरी (अल्बा टेलर)

## विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळवण्यासाठी आनंदनगरीसारखे उपक्रम कौतुकास्पद - श्री विनोदजी पोखरकर

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

येथील अग्रगण्य व उपक्रमशील शैक्षणिक संस्था 'संकल्प विद्या मंदिर' येथे हिंदी विषयातील 'मेला' या पाठाचे औचित्य साधून 'आनंदनगरी'चे अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष व्यापार आणि वित्ताचे धडे गिरवत तब्बल एक लाख रुपयांपेक्षा अधिकची आर्थिक उलाढाल केली. या कार्यक्रमासाठी युवा उद्योजक सय्यद युसुफ कादरी (उर्फ अल्बा टेलर), शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री विजयदादा रापतवार, शाळेचे सचिव श्री कैलास चोले सर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर. एस. यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताने करण्यात आली. त्यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक सय्यद युसुफ कादरी (अल्बा टेलर) यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायात यश मिळवण्याचे विविध पैलू समजावून सांगितले. ते म्हणाले की, व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी सातत्य, चिकाटी आणि कठोर परिश्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत, परंतु त्याचसोबत त्याला दर्जेदार शिक्षणाची जोड असणे तितकेच आवश्यक आहे. तर कार्यक्रमाचे उद्घाटक श्री विजय रापतवार यांनी शाळेच्या शिस्तीचे व नवनवीन उपक्रमांचे कौतुक करत म्हटले की, संकल्प विद्या मंदिर ही विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला योग्य दिशा व चालना देणारी शाळा म्हणून अंबाजोगाई शहरात नावारूपास आली आहे. हे यश केवळ एका व्यक्तीचे नसून सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांच्या एकत्रित परिश्रमाचे फळ आहे.

दुसऱ्या सत्रामध्ये पाहुण्यांच्या हस्ते आनंदनगरीचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी तब्बल १५० हून अधिक स्टॉल्स लावले होते, ज्यामध्ये विविध प्रकारचे स्वादिष्ट खाद्यपदार्थ आणि कल्पक खेळांचा समावेश होता. उपस्थित पाहुण्यांनी व पालकांनी सर्व स्टॉल्सना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक भाषणात मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर. एस. यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांना शालेय वयातच व्यावहारिक ज्ञान, नफा-तोटा या संकल्पना आणि संघभावना (Team Spirit) प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावी, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. यावेळी कु. भूमिका भाबरदोडे हिने आपल्या उत्कृष्ट भाषणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.






### उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव (पुरस्कार विजेते):

Best Marketing and Sale Award: चि. केंद्रे प्रणव केशव, Most Innovative Stall Award: कु. चोले शरयू कैलास, Best Team Spirit Award: कु. गित्ते अनुष्का अच्यु, तसर्वोत्कृष्ट स्टॉल अवॉर्ड (प्रथम): चि. चाटे श्रीकांत रूपेश, चि. पवार स्वराज सतिश, सर्वोत्कृष्ट स्टॉल अवॉर्ड (द्वितीय): कु. चौघुले सानवी लक्ष्मण, कु. चौघुले आराध्य श्रीकांत, सर्वोत्कृष्ट स्टॉल अवॉर्ड (तृतीय): चि. पवार स्पंदन नंदीग्राम, चि. गायकवाड कार्तिक राहुल, तिसऱ्या व अंतिम सत्रामध्ये हॉटेल सुरभीचे सर्वेसर्वा श्री विनोदजी पोखरकर यांच्या हस्ते सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार व अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. श्री पोखरकर यांनी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्याची प्रशंसा केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर व नेटके सूत्रसंचालन कु. स्वरा अंजन आणि कु. प्रांजली मोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कु. निकम श्रेया हिने मानले. सांस्कृतिक विभाग प्रमुख व हिंदी विषय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वृंदाने हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. 'वंदे मातरम'च्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हा परिषदेच्या शाळा मधून संस्कार व संस्कृती आजही जोपासली जाते : उद्योजक प्रवीण वारे

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

राज्यातील खाजगी शाळांच्या तुलनेमध्ये जिल्हा परिषद शाळा मधून विद्यार्थ्यांना चांगले संस्कार मिळतात आणि याच शाळांमधून भारतीय संस्कृतीचे जतन चांगल्या प्रकारे केले जाते. असे प्रतिपादन ' महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार 2026 प्राप्त प्रवीण वारे यांनी बेलगाव येथे केले. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अहिल्यानगर येथे नुकताच सदरचा मानाचा पुरस्कार श्री प्रवीण वारे यांना मिळाला आहे. मराठवाडा भूषण आ.सुरेश धस, समाजसेविका डॉ.सुधाताई कांकरिया, अहिल्यानगर येथील इम्पल्स हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. संदीप गाडे यांच्या शुभहस्ते सदरचा पुरस्कार अहिल्यानगर येथे युवा उद्योजक श्री प्रवीण वारे यांना मिळाला आहे.

यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार ॲड सीताराम पोकळे म्हणाले की, अत्यंत प्रतिकूल आणि बिकट परिस्थितीमध्ये प्रवीण वारे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. आणि आष्टी येथे स्वतःचे स्वतंत्र साम्राज्य उभा केले आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये सुद्धा ते चांगले कार्य करीत आहेत. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून ते काम करतात. म्हणूनच त्यांना सदरचा पुरस्कार मिळाला आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बेलगाव केंद्र येथे केंद्रप्रमुख म्हणून श्री प्रवीण मेहेर सर यांना पदोन्नती मिळाली आहे. त्याबद्दल त्यांचाही स्वागत समारंभ यावेळी आयोजित केला होता. यावेळी म्हसोबा वस्ती येथील शिक्षक वृंद श्रीमती टेकाडे मॅडम व अजय भराटे सर आणि पालकांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की, पालकांनी आपली मुले जिल्हा परिषद शाळेमध्ये पाठवावेत. इयत्ता सातवी पर्यंतच्या वर्गामध्ये शिक्षणाची सोय शासनाने आपापल्या गावी केलेली आहे. त्यासाठी पालकांना कसलाही खर्च येत नाही. याउलट खाजगी शाळांमध्ये मुले पाठवले तर दरवर्षी 50 ते 60 हजार रुपये खर्च प्रत्येक विद्यार्थ्यामागे येतो. हे पैसे वाचवून पालकांनी त्याचा उपयोग पुढील शिक्षणासाठी करावा. असे आवाहनही यावेळी श्री प्रवीण मेहकर सर यांनी केले.



पुढे बोलताना ते म्हणाले की, बेलगाव येथे तीन शाळा आहेत. अंबिका नगर वस्ती शाळा येथे मुलांचे पटसंख्या पूर्ण आहे. म्हसोबा वस्ती शाळा येथील मुलांची पटसंख्या सुद्धा वाढू लागली आहे. गावातील शाळेची विद्यार्थी पटसंख्या वाढवण्यासाठी आम्ही शिक्षक वृंद सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत. गावातील पालकानी व नागरिकांनी आम्हाला सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी बेलगावचे उपसरपंच ज्ञानेश्वर माऊली पोकळे तसेच म्हसोबा वस्ती येथील सर्व शिवश्री दत्ता मारुती पोकळे, सुधीर दिनकर पोकळे, भाऊसाहेब पांडुरंग पोकळे, तानाजी सुभाष पोकळे, दीपक सिताराम पोकळे, दत्ता महादेव पोकळे, बाबासाहेब मच्छिंद्र पोकळे, माजी उपसरपंच सतीश नवनाथ पोकळे, ग्रामपंचायत सदस्य महादेव मारुती महादेव सरोदे, माजी सरपंच जयसिंग मुकिंदा पोकळे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी रमेश पोकळे महेश फुलचंद पोकळे, हनुमंत मुकिंदा पोकळे अक्षय दत्ता पोकळे, अशोक दशरथ पोकळे, नारायण रामभाऊ पोकळे चेअरमन ,जालिंदर मुकिंदा पोकळे ,बाळासाहेब रामभाऊ घाडगे, सतीश रामकिसन पोकळे आदी मान्यवर पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक आदरणीय कारभारी भाऊ मोकिंदा पोकळे हे होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल फुलचंद पोकळे यांनी प्रास्ताविक पर भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक अजय भराटे सर यांनी केले.

# राज्याच्या 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने' उटीच्या प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांचा गौरव

**महागाव** | महागाव तालुक्यातील उटी येथील प्रयोगशील शेतकरी विनोद मैंद यांच्या कृषी क्षेत्रातील संशोधन, नावीन्यपूर्ण प्रयोग आणि शेतकरीहिताच्या कार्याची राज्य शासनाने दखल घेत त्यांना प्रतिष्ठेचा 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार – २०२३' प्रदान करून गौरविण्यात आले. नुकत्याच चार दिवसांपूर्वी

मुंबईच्या वरळी येथील लोटस डोम येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल,फलोत्पादन मंत्री भारत गोगावले,मंत्री इंद्रनील नाईक, कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी सचिव परिमल सिंह तसेच विस्तार संचालक रफिक नाईकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विनोद मैंद यांनी निवड पद्धतीद्वारे सोयाबीनच्या दोन, हरभऱ्याच्या चार आणि तुरीच्या एका सुधारित वाणाची निर्मिती करून कृषी संशोधन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी विकसित केलेल्या तुरीच्या वाणाला 'शिवनेरी-४५' असे नाव दिले असून, हे वाण अधिक उत्पादनक्षम असल्याचा त्यांचा दावा आहे. या वाणाच्या बियाण्यांना राज्यभरातील शेतकऱ्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे.

वाण निर्मितीबरोबरच आधुनिक पीक लागवड पद्धती,उत्पादनवाढ आणि कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयोग केले आहेत. त्यांच्या संशोधनप्रधान




कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा नवा मार्ग मिळाला असून,कृषी क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र आणि प्रेरणादायी स्थान निर्माण केले आहे.

राज्य शासनाकडून प्राप्त झालेला 'शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' हा त्यांच्या अनेक वर्षांच्या अथक परिश्रम, संशोधनवृत्ती आणि शेती विकासासाठीच्या समर्पित कार्याचा गौरव मानला जात असून,महागाव तालुक्यासह यवतमाळ जिल्ह्यासाठीही ही अभिमानाची बाब ठरत आहे.

# अर्णव कऱ्हाड चे वकील होण्याचे स्वप्न साकार



**मुंबई :** वडील डॉ. भारत कऱ्हाड स्वतः सीए आणि मोठा भाऊही सीए. त्यामुळे अर्णवनेही सीए व्हावे, अशी वडिलांची इच्छा होती. मात्र, 'मला सीएमध्ये इंटरेस्ट नाही,' असे अर्णवने स्पष्ट सांगितले आणि स्वतःच्या आवडीचे क्षेत्र निवडले.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या अर्णवने सायन्समधून बीएससी पूर्ण केली. त्यानंतर एमएससी करण्याऐवजी त्याने कायद्याचे शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. मुंबईतील गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये त्याने एलएल.बी.ला प्रवेश घेतला. त्याचा निर्णय वेगळा असला तरी कुटुंबाने त्याला अडवले नाही.

अर्णवला वक्तृत्व आणि ड्राफ्टिंगची आवड आहे. इंग्रजी भाषेवर त्याचे चांगले प्रभुत्व आहे. लोकांशी सहज संवाद साधण्याची त्याची पद्धत आहे. न्यायाधीश होण्याचे स्वप्न घेऊन तो कायद्याच्या क्षेत्रात आला आहे.

नुकताच त्याचा एलएल.बी.चा निकाल जाहीर झाला असून, मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून त्याने कायद्याची पदवी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. घरात सीएचे वातावरण असतानाही अर्णवने स्वतःच्या आवडीची वकिलीची वाट निवडली. आता न्यायाधीश होण्याचे त्याचे स्वप्न आहे.

श्री. सुधाकर चाटे, सुदेश कोसुंबकर, प्रा. शोभा शिंदे, मंगेश खैरनार, डॉ. बालाजी केंद्रे, शेखर परांजपे, गजानन मुळे, सीए वासुदेव यादवाड, प्रा. छाया आबनावे, संपादक बाळासाहेब फड, दिव्या नागरगोजे, आई डॉ. सुवर्णा कराड आणि डॉ. अनिल लोहार यांच्यासह अनेकांनी अर्णवचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.